**फौजदारी किरकोळ अर्ज क्र. ६९/२०२६**
**ग्रा. पोलीस स्टेशन माजलगांव गु.र.नं. ६४/२०२६**
**भा.न्या.स., कलम ३०३(२)**
**CNR No.MHBI09000411-2026**

**निशाणी १ खालील आदेश**

१. अर्जदार सिध्देश्वर पि.भिमराव बर्डे यांनी प्रस्तूतचा अर्ज बी.एन.एस.एस. चे कलम ५०३ नुसार गुन्हयातील जप्त जॉनडीयर कंपनीचे ५३१० ट्रॅक्टर हेड ज्याचा पासिंग क्र. एम.एच.४४/एस.८८६९ असून जिचा चेसीस क्र. IPY5310EKMA058082 व इंजिन क्र. PY3029H167197 असा असून ते त्यांच्या ताब्यात मिळणेकामी दाखल केला आहे. अर्जदाराचे कथन की सदर ट्रॅक्टर हे पोलिसांनी अर्जदाराच्या ताब्यातून सदर गुन्हयाकामी जप्त केलेला आहे. सदर वाहन त्याचे मालकीचे आहे. ते सदर गुन्हयाकामी जप्त असल्याने पोलिस ठाण्यात पडून आहे. त्यामुळे सदर वाहनामध्ये तांत्रिक बिघाड निर्माण होवू शकतो. सदर वाहन अर्जदाराच्या वापराकामी आवश्यक आहे. अर्जदार हा कोर्टाने लादलेल्या अटींचे पालन करण्यास तयार आहे. करिता अर्जदाराने विनंती केली की अर्ज मंजूर करण्यात यावा.

२. सरकारी वकील यांनी त्यांचे म्हणणे मांडले की, जप्त वाहन हे पुराव्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असून जप्त वाहनाचा अर्जदार हा मुळ मालक नसून अर्जदारास सदरचे वाहन ताब्यात दिल्यास सदर वाहणाची विक्री करण्याची शक्यता असल्यामुळे वाहन परत देण्यास हरकत घेतली आहे. तसेच तपासिक आंमलदार यांनी कागदपत्राची पडताळणी करून योग्य आदेश होण्याची विनंती केली.

३. अभिलेखावरून असे दिसते की, सदर गुन्हयाकामी अर्जदाराच्या ताब्यातील सदरचे वाहन जप्त करण्यात आले आहे. अभिलेखात नि.क्र. ०७ सोबत दाखल केलेल्या आर.सी. बुकची पाहणी केली असता इसम नामे नामदेव ज्ञानोबा सादोळकर याचे नावे सदरचे वाहणाची नोंद आहे. परंतु, दि. ०८.०१.२०२६ रोजी

सदरचे वाहन नामदेव सादोळकर यांनी अर्जदारास करारनाम्याद्वारे विक्री केले असल्याचे दिसून येत आहे. वाहणाचे मुळ मालक नामदेव सादोळकर यांनी नि.०९ कडे शपथपत्र दाखल केले असून सदर वाहन अर्जदारास विक्री केल्याचे कथन केलेले आहे व वाहन अर्जदाराचे ताब्यात देण्यास संमती दर्शविले आहे. अशा परिस्थितीत अर्जदार हा जप्त वाहनाचा मालक व ताबेदार असल्याचे सकृतदर्शी दिसून येते. तसेच अर्जदाराने नि.०७ सोबत वाहनाची विमाची प्रत, आधारकार्ड, खरेदीकरार नामा व आर.सी. बुकची पडताळणी केलेल्या प्रती दाखल केलेल्या आहेत. तसेच अर्जदाराने त्याचे अर्जातील कथनाच्या पुष्टयर्थ स्वत:चे प्रतिज्ञापत्र सादर केलेले आहे. शिवाय, अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वाहनाचा ताबा मागितलेला नाही. अशा परिस्थितीत सदरचे वाहन खटला संपेपर्यंत पो. स्टेशनला ठेवणे न्यायोचित होणार नाही. त्यामुळे, जप्त करण्यात आलेले वाहन पो.स्टे. ला ठेवणे योग्य होणार नाही. सबब, सदर वाहनाचा ताबा अर्जदार यांना काही अटी लावून देणे न्यायोचीत ठरते. करिता, पुढील आदेश पारीत करण्यात येत आहेत.

## आदेश

(१) अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

(२) जप्त असलेला जॉनडीयर कंपनीचे ५३१० ट्रॅक्टर हेड ज्याचा पासिंग क्र. एम.एच.४४/एस.८८६९ असून जिचा चेसीस क्र. PY5310EKMA058082 व इंजिन क्र. PY3029H167197 असा असून ते अर्जदार सिध्देश्वर पि.भिमराव बर्डे रा. किट्टीआडगांव, ता. माजलगांव, जि.बीड यास रक्कम रूपये **४,००,०००/—(अक्षरी चार लाख रूपये फक्त)** इतक्या रकमेच्या हानिरक्षण बंधपत्राद्वारे देण्यात यावे.

(३) सदरचे ट्रॅक्टर अर्जदाराचे ताब्यात देताना त्याच्या पुढच्या आणि मागच्या बाजूंची छायाचित्रे घेण्यात यावेत व त्यासंदर्भातील पंचनामा तयार करण्यात यावा.

फौ.कि.अर्ज क्र. ६९/२०२६
नि.१ खालील आदेश

(४) सदरचे ट्रॅक्टर अर्जदार यांनी न्यायालयाच्या आदेशाशिवाय विक्री करू नये व त्याचे मूळ स्वरूपात बदल करू नये अगर नष्ट करू नये व न्यायालयाने आदेश दिल्यास तात्काळ हजर करावी. तसेच अर्जदाराने ट्रॅक्टरचा गुन्हयाकामी उपयोग करू नये.

(५) अर्जदारास आदेशीत करण्यात येते की, सदर वाहनाचे आर.सी.बुक वर त्यांच्या नावाची नोंद त्वरित करून घ्यावी व त्याबाबत तपासिक आंमलदार यांना कळवावे.

(६) प्रस्तूत आदेशाची एक प्रत ही संबंधित गुन्हा नोंद क्रमांक ६४/२०२६ च्या कागदपत्रांमध्ये जोडण्यात यावी.

RAHUL BALBHIM POL

Digitally signed by RAHUL BALBHIM POL
Date: 2026.03.31 16:31:16 +0530

माजलगाव. (आर.बी.पोळ)

दिनांक ३१/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, न्यायालय क्र.१, माजलगाव.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file are word to word as per original Judgment/order".

Dictated, transcribed, checked & signed on : 31/03/2026

Sd/-

Date: 31/03/2026

R.M.Shaikh
Gr-III Stenographer
Judicial Magistrate F.C., Majalgaon.